# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** जयसिंगपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0135 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/04/2026 11:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 30/12/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2026
**Time From (वेळेपासून):** 12:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/04/2026 **Time (वेळ):** 10:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 014
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/04/2026 11:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** इलोसे यांचे घरी, जैनापूर,शिरोळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती उज्वला मारूती भडकमकर

(b) **Husband's Name (पती चे नाव) :** मारूती भडकमकर

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8446153029

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. संगीता रमेश कांबळे | | पती का नाम : रमेश कांबळे | 1. जैनापूर,शिरोळ,जयसिंगपूर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | निकेत रमेश कांबळे | | वडील का नाम : रमेश कांबळे | 1. जैनापूर,शिरोळ,जयसिंगपूर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

तक्रारदार यांनी आज रोजी तक्रार दिलेने

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 27/04/2026

मी. उज्वला मारुती भडकमकर, वय 38 वर्षे, पद - पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो.नं. 8446153029 समक्ष जयसिंगपूर पोलीस ठाणे जि. कोल्हापूर येथे हजर राहुन फिर्याद देते की,

दिनांक 29/12/2025 रोजी आम्ही अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना पोलीस उप अधिक्षक वैष्णवी पाटील यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून घेवून, तक्रारदार श्री मयुर भरत कोथळीकर, वय - 34 वर्षे व्यवसाय - शेडनेट व्यापार, रा. कोथळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांची लाच मागणी संदर्भात तक्रार असुन ते आपणास कोथळी- जैनापूर जाणारे रोडला त्यांचे शेडनेट प्लांट येथे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे भेटणार असुन त्यांचा मोबाईल नंबर 9922868898 असा असुन त्यावर त्यांचेशी संपर्क साधणेबाबत कळवुन तक्रारदार यांचे लाचेच्या तक्रारीप्रमाणे पुढील कारवाईसाठी पंच उपलब्ध करून घेवून पुढील कारवाई करणेबाबत मुखशील आदेश दिले. त्यावेळी आम्ही तक्रारदार श्री मयुर भरत कोथळीकर यांचे मोबाईल नंबरवर संपर्क साधुन त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करता, त्यांनी आम्हास लाचेबाबतची तक्रार सांगितली की, माझे पत्नीचे नांवे जैनापूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर हद्दीतील गट नं.288 मध्ये माझे पत्नीचे नांवे ग्रीन मायरा नेट नावाने शेडनेटचा व्यवसाय सुरू करणार असून, त्याकरीता ग्रामपंचायत जैनापूर यांच्याकडून व्यवसाय परवानगी मिळणेकरीता दिनांक 26/12/2025 रोजी ग्रामविकास अधिकारी जैनापूर यांच्याकडे अर्ज दिला होता. त्यावेळी जैनापूर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर च्या सरपंच कांबळे मॅडम यांना भेटून माझे कामाचे संदर्भात चर्चा करून व्यवसाय परवानगी मिळणेसाठी विनंती केली, त्यावेळी जैनापूर च्या सरपंच कांबळे मॅडम यांनी माझेकडे ग्रीन मायरा नेट नावाने शेडनेटचा व्यवसाय सुरू करण्यासाठीचा परवानगी देणेकरीता 10,000/-रू मागणी केली. त्यावेळी मी सरपंच कांबळे मॅडम यांना काही कमी जास्त करणेबाबत सांगितले, तेव्हा त्यांनी त्यास नकार दिला. तेव्हा मी माझेकडे ऐवढे पैसे नाहीत, मी पैशांची जुळणा करून येतो व भेटतो असे सांगुन निघुन आलो. तेव्हा जैनापूर च्या सरपंच कांबळे मॅडम ह्या माझे जैनापूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर येथील गट नं.288 मध्ये मला ग्रीन सेड नावाचा सेडनेटचा व्यवसाय सुरू करण्यासाठी परवानगी देणेकरीता मागत असलेले 10,000/-रू लाच म्हणुन मागणी करत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु सरपंच कांबळे मॅडम यांना लाच रक्कम देणेची इच्छा नाही, मी सरपंच कांबळे मॅडम यांना दिनांक 30/12/2025 रोजी भेटण्यास जाणार आहे, तरी त्यांचेवर कारवाई करणेत यावी अशी थोडक्यात हकीकत सांगितली. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हास ते त्यांच्या कोथळी-जैनापूर रोडला कोथळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर गावचे हद्दीतील एमएसईबी चे कार्यालयाचे समोरील बाजूस असले ग्रीन शेडनेट प्लान्ट येथे भेटल्यानंतर आम्हास त्यांचा तक्रारीअर्ज व त्यांच्या पत्नीचे संमतीपत्र देतो असे सांगितले. त्यानंतर मी लागलीच मा.उप वनसंरक्षक अधिकारी सा ो, उप वनसंरक्षक कार्यालय, वनविभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयातुन लेखी रिपोर्टने दोन शासकीय पंच यांना दिनांक 30/12/2025 रोजी 09.30 वा. गोपनिय कामकाजाकरीता पाठवावे असे कळविले तसेच आमचे कार्यालयातील सफौ/ सुनिल मोरे, पो.हे.कॉ.267 सुधीर पाटील, मपोहेकॉ/47 संगिता गावडे, पोकॉ 2363 संदीप पवार यांना आम्ही गोपनीय कामाकरीता तयारीसह व अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडे असले शासकीय वाहनावरील चालक पोकॉ/ प्रशांत दावणे यांना कारवाईकरीता जाणेसाठी शासकीय वाहनासह कार्यालयात सकाळी 09.30 वा. हजर राहणेस सांगितले.

दिनांक 30/12/2025 रोजी 09.40 वा. चे सुमारास दोन शासकीय पंच 01) श्री. मारूती केरबा डवरी, वनपाल, 02) श्री.अमित शहाजीराव शिंदे, वनपाल असे हजर झाले. त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेले साहित्य घेवुन, शासकीय वाहनातुन अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालय ते तावडे हॉटेल- सांगली फाटा ते कोल्हापूर-सांगली रोडने कोथळी-जैनापूर

रोडला एमएसईबी कार्यालयाजवळ पोहोचलो. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क करून आम्ही कोथळी-जैनापूर रोडला असले एमएसईबी कार्यालया जवळ बोलेरो वाहनासह आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी एक इसम आमचे गाडीजवळ आले, त्यांना मी त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव श्री मयुर भरत कोथळीकर असल्याचे सांगून आम्हास रस्त्याचे बाजूस असले त्यांचे शेडनेट प्लाॅटमध्ये गाडी घेण्यास सांगितली. त्यावेळी मी तक्रारदार कोथळीकर यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी मयुर कोथळीकर यांनी त्यांचा तक्रारी अर्ज व संमतीपत्र माझेकडे दिले. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार कोथळीकर यांनी वरीलप्रमाणे त्यांची तक्रार पंचाना सांगितली. त्यानंतर तक्रारदार कोथळीकर यांनी आमचेकडे दिलेला तक्रारी अर्ज पंचाना वाचणेस दिला. तक्रारदार कोथळीकर यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार कोथळीकर व पंच नं. 01 मारूती डवरी यांचेसह ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर किंवा सरपंच कांबळे मॅडम यांचे घरी त्यांची भेट घेणेकरीता पाठवुन, कोथळीकर यांचे तक्रारीप्रमाणे, त्यांचेकडे सरपंच कांबळे मॅडम हया लाचेची मागणी करतात अगर कसे? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये KDM कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कोथळीकर व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार कोथळीकर व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 12.11 वाजता चालु करून, तो तक्रारदार कोथळीकर यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन, तक्रारदार कोथळीकर व पंच नं.1 मारूती डवरी यांना सरपंच कांबळे मॅडम यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार कोथळीकर यांचे हिरो हंक मोटार सायकल नं.एमएच 51 डी 6162 वरून पाठविले. त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच नं.02 अमित शिंदे असे सदर ठिकाणी थांबुन राहीलो. तक्रारदार कोथळीकर व पंच नं.1 मारूती डवरी असे सरपंच कांबळे मॅडम यांना भेटुन आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 12.43 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 डवरी यांना आमचेजवळ बोलावुन घेवून त्यांना, पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार यांचेसोबत ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे सरपंच कांबळे मॅडम यांची भेट घेण्याकरीता गेले त्यावेळी सरपंच कांबळे व तक्रारदार यांची भेट झाली का? त्यांच्यामध्ये काय संभाषण झाले याबाबत विचारणा करता, पंच नं.01 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांच्या मोटार सायकलवरून ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे गेलो, त्यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच कांबळे मॅडम हजर नव्हत्या, त्यावेळी तक्रारदार व मी सरपंच कांबळे मॅडम यांच्या जैनापूर येथील घरी गेलो, तेथे तक्रारदार, सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा यांची भेट झाली. त्यांच्यामध्ये तक्रारदार यांच्या व्यवसाय परवानगीबाबत बोलणे झाले. त्यामध्ये तक्रारदार 'आपल काय तर कमी करूया...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम 'नाही नाही मी आता तस नाही करणार...', असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार 'दहा हजार जरा जास्त होत्यात...', असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम यांचा मुलगा निकेत 'मी तर या गोष्टीत पडत नाही...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार 'मॅडम माझ एैका, दहा हजरा पैक्षा शेवट माझ एैका तुम्ही म्हणला तर शेवट तेवढच देणार मी, एक रूपये कमी करत नाही, मी फक्त एक आठ हजार रूपये देतो...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम 'आर काय तुम्ही दोन...हेच्यासाठी एवढ...' असे म्हणाल्या, त्यावर सरपंच मॅडम यांचा मुलगा निकेत 'तेजी एक फाॅरमॅलिटी असतीया येवढा विषय वाढला पण नसता तुमच त्याच दिवशी काम झाल असत...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार 'मॅडम माझ एक एैका आता हे दहा हजार रूपये सोडुन कोणाला एक रूपया देणार नाही...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम यांचा मुलगा निकेत 'नाही नाही...' असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो अषी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही पंच नं.01 डवरी यांना बाजूला थांबणेस सांगून तक्रारदार कोथळीकर यांच्याकडे हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.01 डवरी यांच्या हकिकतीप्रमाणे मिळतीजुळती हकिकत साांगितली.

त्यानंतर पंच नं.1 मारूती डवरी व तक्रारदार कोथळीकर यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेकाॅर्डमधील रेकाॅर्ड झालेले संभाषण तक्रारदार व पंच नं.01 डवरी यांचेसमक्ष संभाषण ऐकले असता, तक्रारदार कोथळीकर यांचेकडे त्यांचे मौजे जैनापूर गावचे हद्दीतील गट नं.288 मध्ये तक्रारदार यांना त्यांच्या पत्नींचे नांवे मायरा ग्रीन नेट नावाने व्यवसाय सुरू करण्याकरीता ग्रामपंचातय जैनापूर कार्यालयाकडून व्यवसाय परवानगी मिळण्याकरीता जैनापूरच्या सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे पैशाची मागणी केली परंतू त्यामध्ये लाच रक्कमेचा स्पष्ट उल्लेख न आल्याने आम्ही परत जैनापूरच्या सरपंच कांबळे मॅडम यांच्या लाच मागणीची परत पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर तक्रारदार कोथळीकर यांच्याकडे डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर 14.48 वा. सुरू करून तो तक्रारदार यांच्या गळयात अडकवून पंच नं.01 डवरी यांचे सह तक्रारदार यांच्या मोटार सायकल वरून सरपंच कांबळे मॅडम यांच्या घरी पाठवून देवून मी, पंच नं.02 षिंदे व सापळा पथक असे तक्रारदार यांचे शेडनेटचे प्लॅन्टवर थांबुन राहिलो. काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1 डवरी असे आम्ही थांबलेले ठिकाणी परत आले, तेव्हा आम्ही तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर काढुन घेवून तो 15.14 वा. बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.1 डवरी यांना आमचेजवळ बोलावुन घेवून त्यांना, पडताळणी कारवाईवेळी तक्रारदार यांचेसोबत सरपंच कांबळे मॅडम यांची भेट घेण्याकरीता गेले त्यावेळी सरपंच कांबळे व तक्रारदार यांची भेट झाली का? त्यांच्यामध्ये काय संभाषण झाले याबाबत विचारणा करता, पंच नं.01 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे सरपंच कांबळे मॅडम यांच्या जैनापूर येथील घरी गेलो, तेथे तक्रारदार, सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा यांची भेट झाली. त्यांच्यामध्ये तक्रारदार यांच्या व्यवसाय परवानगीबाबत बोलणे झाले. त्यामध्ये तक्रारदार ' हां हां म्हणजे परत हितच यायला लागणार ना द्यायला म्हणुन विचाराय लागलोय...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' नाही ते पोरग्याच्या ह्याव सोडा की डायरेक्ट...', असे म्हणाल्या, त्यावेळी सरपंच मॅडम यांचा मुलगा निकेत ' नाही मोबाईल नंबर वर नको बाय हॅन्ड घेवुया की...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार ' का कॅश देतो की तेला काय ...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' नाही नाही ए◌ैका माझ आता पद संपत आलय, लय मला हे करू नका माझ शेवटचच हाय बघा हे...', असे म्हणाले,त्यावर तक्रारदार ' किती देवु सांगा फायनल...', असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' हाय मी सांगितलय तेवढच दया मला, आणि तुमी आणि ग्रामसेवक ते तुमच तुमी बघुन घ्या...', असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार ' ते माझ मी बघतो पण मी काय म्हणतोय, मला एक फिक्स सांगा किती देवु, तुम्ही मला माझेसाठी...', असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' चार पाचशे रूपये कमी दया...', असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार ' म्हजे किती देवु...', असे म्हणाले, त्यावर सरपंच कांबळे मॅडम ' नऊ हजार दया की ...' असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार 'नऊ हजार...' असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' आता हेज्याकडच दया की...' असे म्हणून  लाच रक्कम मुलगा निकेत यांच्याकडे देण्यास सांगतात, त्यावेळी तक्रारदार ' हेंच्या दादाकड देवु...', 'चालतय दादा मला का◌ॅल कर लगेच येतो मी, फक्त मॅंडम जरा लवकर, येवका मी आता गाडी घेवुनच येतो...', असे म्हणाले, त्यावर सरपंच मॅडम ' बर बर..., असे म्हणाल्या. त्यानंतर तक्रारदार व मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो अशी हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही पंच नं.01 डवरी यांना बाजूला थांबणेस सांगून तक्रारदार कोथळीकर यांच्याकडे हकिकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.01 डवरी यांच्या हकिकतीप्रमाणे मिळतीजुळती हकिकत सा◌ांगितली.

त्यानंतर पंच नं.1 मारुती डवरी व तक्रारदार कोथळीकर यांचेकडुन हकीकत ऐकुण व्हाईस रेका◌ॅर्डमधील रेका◌ॅर्ड झालेले संभाषण तक्रारदार व पंच नं.01 डवरी यांचेसमक्ष सभाषण ऐकले असता, तक्रारदार कोथळीकर यांचेकडे त्यांचे मौजे जैनापूर गावचे हद्दीतील गट नं.288 मध्ये तक्रारदार यांना त्यांच्या पत्नींचे नांवे मायरा ग्रीन नेट नावाने व्यवसाय सुरू करण्याकरीता ग्रामपंचातय जैनापूर कार्यालयाकडून व्यवसाय परवानगी मिळण्याकरीता जैनापूरच्या सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडे 10,000/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 9,000/-रू लाच रक्कमेची मागणी करून लाच रक्कम सरपंच कांबळे मॅडम यांच्या मुलाने फोन केल्यानंतर घेवून येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले.

आम्ही तक्रारदार व सरपंच कांबळे मॅडम यांच्यामध्ये पडताळणी कारवाईवेळी ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ए◌ैकत असताना तक्रारदार कोथळीकर यांच्या मोबाईल फोनवर जैनापूरचे ग्रामविकास अधिकारी जाधव यांचा फोन येत असल्याचे तक्रारदार यांनी मला सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी मी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर फोन स्पिकर ऑन करून रिसीव्ह केला, त्यावेळी ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी तक्रारदार यांना त्यांची जैनापूर हद्दीतील गट नं.288 ची एन.ए.ऑर्डर घेवून 10 मिनीटात ग्रामपंचायत कार्यालयात येण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी मला गट नं.288 ची एन.ए.ऑर्डर घेवून गेल्यानंतर त्यांच्या कामाकरीता ग्रामविकास अधिकारी जाधव हे त्यांच्या पैशाची मागणी करू शकतात असले सांगितले. याकरीता आम्ही जैनापूरचे ग्रामविकास अधिकारी जाधव हे तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी करतात अगर कसे ? यांची पडताळणी करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार कोथळीकर व सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांच्यामध्ये पडताळणी करवाईवेळी वापरलेले मेमरी कार्ड डिजिटल व्हाईस रेका◌ॅर्डर मधून काढून माझे ताब्यात घेतले. त्यावेळी तक्रारदार व दोन्ही पंच यांना ग्रामविकास अधिकारी जाधव यांच्या लाच मागणी पडताळणी करवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये दोन्ही पंच व तक्रारदार यांना दाखवून त्यामध्ये नविन KDM कंपनीचे 8 GB मायक्रो कार्ड टाकले व तक्रारदार व दोन्ही पंच यांची निवेदने रेका◌ॅर्ड केली. त्यानंतर डिजीटल व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर 17.24 वा. सुरु करून तो तक्रारदार यांचे गळयात शर्टचे आतील बाजुस काळे रंगाच्या

धाग्याच्या साहाय्याने अडकवून देवून तक्रारदार व पंच नं.01 डवरी यांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलवरून ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे ग्रामविकास अधिकारी जाधव यांची भेट घेण्याकरीता पाठवून देवून मी, पंच नं.02 व सापळा पथक असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी थांबून राहिलो. थोडया वेळात तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर काढुन घेवून तो 17.46 वा. बंद केला.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना बाजूला थांबणेस सांगुन पंच नं.1 मारूती डवरी यांना आमचेजवळ बोलावुन घेवून त्यांना, तुम्ही तक्रारदार कोथळीकर यांचेसोबत ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे ग्रामविकास अधिकारी जाधव यांचेशी तक्रारदार यांची भेट झाली काय? त्यांचेत व तक्रारदार यांचेत काय संभाषण झाले? याबाबत विचारणा करता पंच डवरी यांनी सांगितले की, तक्रारदार व मी असे ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे गेलो असता, तेथे ग्रामविकास अधिकारी जाधव नव्हते, तेव्हा तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी यांना ग्रामविकास अधिकारी जाधव साहेबांन बाबत विचारणा केली असता, त्यांनी जाधव साहेब गेले असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईल फोनवरून ग्रामविकास अधिकारी जाधव यांना स्पिकर फोन करून फोन केला. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी जाधव व तक्रारदार यांच्यामध्ये तक्रारदार यांच्या प्ला ॅटच्या एन.ए. ऑर्डरबाबत बोलणे होवून ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी तक्रारदार यांना वैयक्तीक कामानिमित्त बँकेत गेलो असल्याचे सांगून ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी परीट यांना उदया व्यवसाय परवानगीचे काम करण्यास सांगतो असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार असे आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो असे सांगितले.

त्यानंतर पंच नं. 1 डवरी यांना बाजुला थांबणेस सांगुन बाजूस तक्रारदार कोथळीकर यांना आमचेजवळ बोलावून घेतले. त्यांना पंच नं. 1 डवरी यांचेसोबत ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे जावून ग्रामविकास अधिकारी जाधव व तुमची भेट झाली काय? तुमचेत काय संभाषण झाले? याबाबत विचारणा करता तक्रारदार यांनी पंच नं.1 डवरी यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेका ॅर्डरमधील तक्रारदार मयुर कोथळीकर व ग्रामविकास अधिकारी जाधव तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंच डवरी व तक्रारदार यांचेकडून आवाज ओळखून पंचासमक्ष ऐकले. सदर ऐकले संभाषणावरुन ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी त्यांचे वैयक्तीक काम असल्याने बॅकेत गेले असल्याचे सांगितले तसेच तक्रारदार यांचे व्यवसाय परवानगीचे काम उदया ग्रामपंचायत कार्यालयातील कर्मचारी परीट यांना तयार करण्यास सांगतो असे म्हणालचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना सरपंच कांबळे मॅडम यांचा मुलगा निकेत यांचा फोन न आल्याने आमचे सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी निकेत कांबळेचे फोनवर स्पिकर फोन करून परवाना घेणेकरीता येवू काय? अषी विचारणा केली असता, निकेत कांबळे यट पाहिली परंतू त्यांचा फोन आला नाही. त्यावेळी तक्रारदार यांनी परवानगी ऑर्डर तयार झाली नसल्याने त्यांनी फोन केला नसेल असे सांगितलेने, आम्ही पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करून पुढील कारवाई उदईक दिनांक 31/12/2025 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर आम्ही सर्वांना कारवाईचे अनुषंगाने गोपनियता राखण्याच्या सुचना देवून तक्रारदार यांच्या शेडनेट प्ला ॅटपासून 19.30 वा. निघून 20.40 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात पोहोचलो व पडताळणी कारवाईचे पुढील कामकाज अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, कोल्हापूर येथे 20.40 वा.ते 23.30 वा मुदतीत पुर्ण केली.

त्यानंतर आमचे सुचनेनुसार पोहेका ॅ/सुधीर पाटील यांनी तक्रारदार कोथळीकर, सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे तसेच तक्रारदार व ग्रामविकास अधिकारी जाधव यांचेतील पडताळणी कारवाई दरम्यान डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डरवर ध्वनिमुद्रीत झालेले प्रत्यक्ष भेटीवेळीचे तसेच फोनवरील संभाषण ए ैकुण त्याच्या वेगवेगळ्या सविस्तर स्क्रिप्ट तयार केल्या आहेत. त्यानंतर सरपंच कांबळे मॅडम, त्यांचा मुलगा निकेत कांबळे व तक्रारदार कोथळीकर यांचेतील पडताळणी कारवाईवेळी वापरलेले मेमरी कार्ड आम्ही जप्त करुन ताब्यात घेतले तसेच तक्रारदार व ग्रामविकास अधिकारी जाधव यांच्यातील पडताळणी कारवाईवेळी वापरलेले मेमरी कार्ड एका प्लॅस्टिकचे पाऊचमध्ये ठेवुन सुरक्षितरित्या ताब्यात घेतले.

पडताळणी कारवाई दिले सुचनेप्रामणे दिनांक 31/12/2025 रोजी आम्ही अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना वरील नमुद दोन्ही पंच 10.00 वा. सुमारास कार्यालयात हजर झाले त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन कार्यालयातील सापळा पथकातील अंमलदार असे शासकीय वाहनातुन कोल्हापूर-सांगली रोडने कोथळी-जैनापूर रोडला असले तक्रारदार यांच्या शेडनेट प्ला ॅट येथे 11.30 वा.पोहोचलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते. त्यावेळी आम्ही तक्रारदार कोथळीकर यांना सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत यांचा का ॅल आला होता

काय? अषी विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हांस फोन आलेला नाही, तसेच ग्रामविकास अधिकारी जाधव हे ग्रामपंचायत कार्यालयात येणार नसल्याची माहिती समजली असल्याचे सांगितले. त्यामुळे आम्ही सर्व तक्रारदार यांना सरपंच कांबळे मॅडम किंवा त्यांचा मुलगा निकेत याचा फोन येण्याची वाट पाहत थांबुन राहिलो, तसेच ग्रामविकास अधिकारी हे ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर येथे आले नाही. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना सरपंच कांबळे मॅडम किंवा त्यांचा मुलगा निकेत यांचा निरोप आल्यास तसेच ग्रामविकास अधिकारी जाधव हे ग्रामपंचायत कार्यालयास आल्यास आमचेशी तात्काळ संपर्क साधण्यास सांगितले. त्यानंतर सर्वांना गोपनियता राखण्याबाबत सुचना देवून आम्ही परत अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात आलो. त्यानंतर आम्ही दिनांक 01/01/2026 रोजी कार्यालयात असताना तक्रारदार कोथळीकर यांच्याशी फोनवर संपर्क केला असता, तक्रारदार यांनी सांगितले की, ग्रामविकास अधिकारी जाधव यांना फोन केला असता त्यांनी उदया दिनांक 02/01/2026 रोजी 12.30 वा. येण्यास सांगितले असल्याचे आम्हास सांगितले.

त्यानंतर आम्ही दिनांक 02/01/2026 रोजी आम्ही अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना वरील नमुद दोन्ही पंच 09.40 वा. सुमारास कार्यालयात हजर झाले त्यानंतर आम्ही, सापळा पथकातील अंमलदार, शासकीय दोन्ही पंच असे सापळा कारवाई करीता आवश्यक असलेली सामुग्री घेवुन कार्यालयातील सापळा पथकातील अंमलदार असे शासकीय वाहनातुन कोल्हापूर-सांगली रोडने कोथळी-जैनापूर रोडला असले तक्रारदार यांच्या शेडनेट प्ला ॅट येथे 11.30 वा.पोहोचलो. त्यावेळी तेथे तक्रारदार उपस्थित होते.
त्यावेळी आम्ही प्रथम ग्रामविकास अधिकारी जाधव यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याचे ठरवुन तक्रारदार कोथळीकर व पंच यांना दिलेल्या सुचनांची उजळणी केली. त्यानंतर दिनांक 30/12/2025 रोजी ग्रामविकास अधिकारी जाधव यांच्या पडताळणी करवाईवेळी वापरलेले KDM कंपनीचे 8 GB मायक्रो कार्ड आमचेकडील प्लॅस्टिकचे केस मधून काढून तक्रारदार व पंचाना दाखवून, ते डिजिटल व्हाईस रेका ॅर्डर मध्ये टाकून, व्हाईस रेका ॅर्डर सुरू करून त्यामध्ये दिनांक 30/12/2025 रे ाजी ग्रामविकास अधिकारी जाधव यांची पडताळणी करवाई करताना रेका ॅर्ड झालेली 02 फाईल असल्याची तक्रारदार व दोन्ही पंच यांची खात्री करून दिली. त्यानंतर डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर 12.13 वा. सुरू करून तक्रारदार व पंच नं.01 डवरी यांना जैनापूर ग्रामविकास अधिकारी जाधव यांची भेट घेण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालयात पाठवून देवून आम्ही, पंच नं.02 व सापळा पथक असे तक्रारदार यांच्या शेडनेट प्ला ॅटवर थांबून राहिलो. दिले. थोडयावेळाने तक्रारदार व पंच नं.01 डवरी हे आम्ही थांबलेले ठिकाणी परत आले. त्यावेळी डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर तक्रारदार यांच्याकडून काढुन घेवून तो 12.32 वा. बंद केला.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना बाजूला थांबणेस सांगुन पंच नं.1 डवरी यांना तक्रारदार यांचेसोबत ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर, ता.शिरोळ येथे ग्रामविकास अधिकारी जाधव यांचेशी तक्रारदार यांची भेट झाली काय? त्यांचेत व तक्रारदार यांचेत काय संभाषण झाले? याबाबत विचारणा करता पंच नं.01 यांनी सांगितले की, तक्रारदार व मी ग्रामपंचायत कार्यालया जैनापूर येथे गेल्यावर तेथे ग्रामविकास अधिकारी जाधव हजर नव्हते, तेथील कर्मचारी यांच्याकडे तक्रारदार यांनी जाधव साहेबांन बाबत विचारणा करता, त्यांनी ग्रामविकास अधिकारी हे निमशिरगांव, ता. शिरोळ येथील ग्रामपंचायत कार्यालयात असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याकडे विचारणा करता तक्रारदार यांनी पंच नं.1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास निमशिरगांव जवळ असल्याने ग्रामविकास अधिकारी जाधव यांना निमशिरगांव, ता.शिरोळ येथे जावून भेटतो असे सांगितले. आम्ही ग्रामविकास अधिकारी जाधव यांची लाच मागणी पडताळणी तक्रारदार यांना निमशिरगांव, ता.शिरोळ येथे पाठवून करण्याचे ठरविले. त्यावेळी आम्ही डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर 14.00 वा. सुरू करून तक्रारदार व पंच नं.01 यांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलवरून निमशिरगांव, ता.शिरोळ येथे पाठवून देवून आम्ही सर्व तेथेच थांबून राहिलो. थोड्यावेळात तक्रारदार व पंच नं.01 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आल्यानंतर तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर काढुन घेवून तो 14.44 वा. बंद केला.

त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना बाजूला थांबणेस सांगुन पंच नं.1 डवरी यांना तक्रारदार यांचेसोबत ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर, ता.शिरोळ येथे ग्रामविकास अधिकारी जाधव यांचेशी तक्रारदार यांची भेट झाली काय? त्यांचेत व तक्रारदार यांचेत काय संभाषण झाले? याबाबत विचारणा करता पंच नं.01 यांनी सांगितले की, तक्रारदार व मी निमशिरगांव ग्रामपंचायत कार्यालयात गेलो त्यावेळी तक्रारदार व ग्रामविकास अधिकारी जाधव यांच्या तक्रारदार यांच्या कामा विषयी बोलणे झाले, त्यामध्ये तक्रारदार 'होय सर काय करूया मार्ग...' असे म्हणाले, त्यावर ग्रामविकास अधिकारी ' मिटींग मिटींग मिटींग...' असे म्हणाले, त्यावर तक्रारदार 'येवढाच मार्ग हाय...' असे

म्हणाले, त्यावर ग्रामविकास अधिकारी ' आता पुटअप काय करू नका कारण ते मला पण बरोबर वाटणा, कुणाला काय विचारू पण नका, मी पुढच्या मिटींगला ठेवतोय काय तरी चर्चा होईल तेच्यावर...' असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याकडे विचारणा करता, तक्रारदार यांनी पंच नं.1 डवरी यांचेप्रमाणे एकमेळाची हकिकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजिटल व्हाईस रेका ॅर्डरमधील तक्रारदार मयुर कोथळीकर व ग्रामविकास अधिकारी जाधव यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंच मारूती डवरी व तक्रारदार यांचेकडून आवाज ओळखून पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी ग्रामपंचायतच्या पुढील मिंटींगमध्ये पुटअप करतो, त्यावर काय तरी चर्चा होईल, असे सांगितलेचे पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास आम्ही जैनापूरच्या सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी तक्रारदार कोथळीकर यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी ग्रामपंचायत जैनापूर कढून व्यवसाय परवानगी देणेकरीता मागणी केलेल्या लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई ठरविले. त्यावेळी आम्ही सदर ठिकाणावरून सापळापुर्व व सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरविले. सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही सर्वांना सर्व सुचना दिल्या. त्यानंतर मी तक्रारदार कोथळीकर यांना लाच रक्कमे बाबत विचारणा केली, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या बचतीमधील 500/- दराच्या 18 भारतीय चलनी नोटा अशी 9,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार कोथळीकर व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोका ॅ/प्रशांत दावणे यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून पुढील सापळापुर्व कारवाईच्या अनुषंगाने तपासण्या करुन अँथ्रासिन लावलेले 9,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार कोथळीकर, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार कोथळीकर यांना सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांनी त्यांचेकडील रूमाल काढून चेह-यावरून फिरवून लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर शासकीय डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डरमध्ये नवीन KDM कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेका ॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार कोथळीकर व पंचाची खात्री करून दिली. डिजीटल व्हा ॅईस रेका ॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार कोथळीकर व दोन्ही पंचाची निवेदने घेतली. त्यानंतर सापळा कारवाईवेळी इलोसे यांना ताब्यात घेताना पोका ॅ/संदीप पवार यांना त्यांच्याकडील मोबाईल फोनमध्ये व्हिडीओ शुटिंग करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेका ॅर्डर 15.31 वाजता सुरू करून, तो तक्रारदार कोथळीकर यांचे शर्टचे आतमध्ये काळया दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार कोथळीकर व पंच नं.1 डवरी असे त्यांचे मोटर सायकलने आम्ही थांबलेल्या तक्रारदार यांच्या शेडनेट प्लांट ठिकाणापासुन जैनापूरच्या सरपंच कांबळे यांच्या जैनापूर गावातील घराकडे निघाले. त्यावेळी त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.2 अमित षिंदे असे आमचेकडील चारचाकी वाहनातुन तक्रारदार यांचे पाठोपाठ गेलो. त्यावेळी तक्रारदार कोथळीकर व पंच नं.1 डवरी असे ग्रामपंचायत कार्यालय जैनापूर समोरील गल्ली मध्ये त्यांच्या कडील मोटार सायकलने जावून सरपंच कांबळे मॅडम यांच्या घरात गेले. आम्ही सरपंच कांबळे मॅडम यांच्या घराचे आजूबाजूला सापळा लावुन थांबलो. थोडयावेळात तक्रारदार कोथळीकर यांनी सरपंच कांबळे मॅडम यांनी लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा न करता तेथून त्यांच्याकडील मोटार सायकलवरून तक्रारदार व पंच नं.01 असे तेथून निघाले, त्यांचेपाठोपाठ मी, पंच नं.02 व सापळा पथकातील अंमलदार असे आमचेकडील शासकीय बोलेलो गाडीने आलो. तक्रारदार हे सापळा रवाना केलेल्या ठिकाणी कोथळी-जैनापूर रोडला असले त्यांचे शेडनेट प्लांटवर परत आले, त्यांचे पाठोपाठ आम्ही सर्व आलो, त्यावेळी तक्रारदार कोथळीकर यांचेकडील व्हाईस रेका ॅर्डर 16.04 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही तक्रारदार व पंच नं.01 डवरी यांना सापळा कारवाईवेळी काय हकीकत घडली असे विचारले असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार कोथळीकर व मी असे सरपंच कांबळे मॅडम यांच्या घरी गेलो, त्यावेळी सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे व तक्रारदार यांची भेट झाली त्यांच्यामध्ये तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलले झाले. त्यावेळी तक्रारदार 'तर तुम्हाला सांगितल्या प्रमाणे पैसे आणुन देवुन जावु...' असे म्हणाले, त्यावर सरपंच कांबळे मॅडम 'नको नको हि झाल्या...' असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार 'का?...' असे म्हणाले, त्यावर सरपंच कांबळे मॅडम 'नाही हयो व्यवहार हाय...' असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार 'नाही मी काय म्हणतोय, आपल ठरल्या प्रमाण पैसे देवुन जातो तुम्ही कधी करताय तवा करा...' असे म्हणाले, त्यावर सरपंच कांबळे मॅडम यांचा मुलगा निकेत 'हे नको नको नको...' असे म्हणाले, त्यावर सरपंच कांबळे मॅडम 'व्यवहार मध्ये नाही तुम्हाला

दिल्या शिवाय नाही माझी सही झाल्या शिवाय घेण हे पण चुकीच हाय...' अस म्हणाल्या, त्यावर सरपंच कांबळे मॅडम 'माझे परीच मी करायचा प्रयत्न करतो सोडा...' असे म्हणाल्या, त्यावर तक्रारदार निकेत दा जरा...' असे म्हणाले, त्यावेळी सरपंच कांबळे मॅडम यांचा मुलगा निकेत 'मी लावतो जावा मॅटर...' असे म्हणाल्या असे म्हणून तक्रारदार यांचे व्यवसाय परवान्याचे काम करून दिल्याषिवाय त्याच्याकडून पैसे घेण्यास नकार दिल्याने, तक्रारदार व मी सापळा लावलेल्या ठिकाणी परत आले असे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्याकडे विचारणा करता त्यांनी पंच नं.01 यांच्या प्रमाणे एकमेळाची हकीकत सांगितली.

त्यानंतर सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी तक्रारदार यांचे व्यवसाय परवानगीचे काम ग्रामपंचायतच्या येणा-या मिटींगमध्ये ठेवून करून घेतो असे सांगितले तसेच ग्रामविकास अधिकारी जाधव यांनीही तक्रारदार यांना ग्रामपंचायत मिटींगमध्ये ठेवुन करून घेतो असे सांगितलेने आम्ही तक्रारदार कोथळीकर यांना त्यांच्या व्यवसाय परवानगीबाबत ग्रामपंचायत जैनापूर येथे मिटींग झाल्यानंतर आम्हास कळविण्याबाबत सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वांना गोपनियता राखण्याबाबत सुचना देवून सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित केली.

तक्रारदार यांच्या जैनापूर-कोथळी रोडवरील शेडनेट प्लाॅन्ट पासून आमचेकडील शासकीय बोलेरो गाडीने 17.45 वा. निघून 19.00 वा. अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात पोहोचलो. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आल्यानंतर आमचे सुचनेनुसार पोहेकाॅ /सुधीर पाटील यांनी तक्रारदार कोथळीकर व ग्रामविकास अधिकारी जाधव यांच्यातील पडताळणी कारवाईवेळी तसेच सरपंच कांबळे मॅडम, त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांचेतील सापळा कारवाई दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरवर ध्वनिमुद्रीत झालेले संभाषणाची वेगवेगळी सविस्तर स्क्रिप्ट तयार केली. त्यानंतर सदर मेमरी कार्ड डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमधून बाहेर काढून ते जप्त केले.

त्यानंतर आम्ही वेळोवेळी फोनवरून तक्रारदार यांच्या संपर्कात होतो. दिनांक 26/01/2026 रोजी झालेल्या जैनापूर ग्रामपंचायत मिटींगमध्ये तक्रारदार कोथळीकर यांचे व्यवसाय परवानगी मिळणेबाबतचा ठराव नामंजूर करण्यात आल्याबाबत तक्रारदार यांनी आम्हास कळविले आहे. त्यानंतर आम्ही सदरची सापळा कारवाई स्थगित करून दिनांक 12/02/2026 रोजी तक्रारदार यांना त्यांच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने जबाब नोंदविला त्यामध्ये तक्रारदार कोथळीकर यांनी दिनांक 05/02/2026 रोजी जैनापूरचे ग्रामविकास अधिकारी जाधव यांना त्यांचे व्यवसाय परवानगीबाबत विचारणा केली असता, ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी तक्रारदार यांना मायरा ग्रीन शेड नेट व्यवसाय परवानगी मिळण्याकरीता पंचायत समिती, शिरोळ, जि.कोल्हापूर यांच्याकडे अर्ज करण्यास सांगून, पंचायत समिती कार्यालयाकडून जैनापूर ग्रामपंचायतकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांचे परवानगीचे काम करून देतो असे सांगितले, तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारी अर्जाबाबत कार्यवाही सुरू ठेवणेस विनंती केली. दरम्यान तक्रारदार कोथळीकर यांचे मायरा ग्रीन नेट व्यवसाय सुरू करण्याचे प्रकरण बँकेकडून नाकारण्यात आलेचे तक्रारदार यांनी आम्हास कळविले. त्यानंतर दिनांक 01/04/2026 रोजी तक्रारदार मयुर भरत कोथळीकर यांचा त्यांच्या तक्रारीचे अनुषंगाने सविस्तर जबाब नोंद केला, त्यामध्ये तक्रारदार कोथळीकर यांनी त्यांचे मायरा ग्रीन नेट व्यवसाय परवानगी मिळण्याबाबत प्रस्ताव जैनापूर ग्रामपंचायत कार्यालयाकडून नाकारण्यात आल्याने जैनापूरच्या सरपंच कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी माझेकडे व्यवसाय सुरू करण्याकरीता परवानगी देणेकरीता 10,000/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती मागणी केलेले 9,000/- लाच रक्कम माझेकडून स्विकारणार नाहीत याची मला खात्री झालेली असल्याचे त्यांचे जबाबामध्ये सांगितले आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार श्री. मयुर भरत कोथळीकर, रा. कोथळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचे मौजे जैनापूर ग्रामपंचायतच्या हद्दीतील ग टनं.288 मध्ये पत्नींचे नांवे मायरा ग्रीन नेट नावाने व्यवसाय सुरू करण्याकरीता ग्रामपंचायत जैनापूर कार्यालयाकडून व्यवसाय सुरू करण्याची परवानगी देणेकरीता ग्रामपंचायत जैनापूर, ता.षिरोळ, जि.कोल्हापूर येथील सरपंच कांबळे मॅडम यांनी त्यांच्या स्वतःकरीता तक्रारदार मुयर कोथळीकर यांच्याकडे बेकायदेशीर व अप्रमाणिकपणे 10,000/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 9,000/-रू लाच रक्कम मागणी केली व त्यांचा मुलगा निकेत कांबळे यांनी सरपंच कांबळे मॅडम यांचे लाच मागणीस बेकायदेशिर व अप्रमाणिकपणे प्रोत्साहन दिले आहे म्हणुन माझी जैनापूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर च्या सरपंच इतर आरोपी लोकसेवक श्रीमती कांबळे मॅडम व त्यांचा मुलगा निकेत कांबळे (खाजगी इसम), दोघे रा.जैनापूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SANTOSH SHIVAJI GORE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

पोलीस ठाणे अंमलदार
**Name (नाव):** SANTOSH SHIVAJI (

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**